# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 19 February 2025

## Time 7.10 AM to 7.20 AM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक १९ फेब्रुवारी २०२५ सकाळी ७.१० मि.

****

- छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९५ व्या जयंतीनिमित्त देशभर विविध कार्यक्रमांचं आयोजन, राज्यातल्या सर्व जिल्ह्यांमध्ये ‘जय शिवाजी-जय भारत’ पदयात्रा
- सहाव्या राज्य वित्त आयोगाच्या स्थापनेला राज्य मंत्रिमंडळाची मंजूरी
- यंदाचा केंद्रीय अर्थसंकल्प प्रगती आणि विकासाची नवी दालनं खुली करून देणारा असल्याचं केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांचं प्रतिपादन

आणि

- नवव्या आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी क्रिकेट स्पर्धेला आजपासून सुरुवात, भारत-बांग्लादेश लढत उद्या

छत्रपती शिवाजी महाराजांची ३९५ वी जयंती आज साजरी होत आहे. यानिमित्त राज्यासह देशभरात अनेक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. शिवजयंतीनिमित्त राज्यातल्या सर्व जिल्ह्यांमध्ये आज ‘जय शिवाजी-जय भारत’ पदयात्रा काढण्यात येणार आहे. केंद्रीय युवक कल्याण आणि क्रीडा मंत्रालय तसंच महाराष्ट्र शासनाच्या संयुक्त विद्यमाने या पदयात्रेचं आयोजन करण्यात आलं आहे. पुण्यात केंद्रीय युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्री डॉ. मनसुख मांडविय तसंच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत ही पदयात्रा निघेल, केंद्रीय क्रीडा

राज्यमंत्री रक्षा खडसे यांच्यासह अनेक मंत्री आणि २० हजार `माय भारत स्वयंसेवक` या पदयात्रेत सहभागी होणार आहेत.

आजच्या शिवजयंती सोहळ्याबाबत अधिक माहिती देणारा हा वृत्तांत...

***शिवसृष्टीच्या दुसऱ्या टप्प्याचं लोकार्पणही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज होणार आहे. पुण्याजवळ आंबेगाव ब्रुद्रुक इथं साकारत असलेल्या शिवसृष्टीत प्रतापगडावरच्या भवानी मातेच्या मंदिराची प्रतिकृती असलेलं मंदिर साकारण्यात आलं आहे. दर वर्षीप्रमाणे यंदाही शिवजयंतीनिमित्त पुण्यात लालमहालातून शिवजन्मोत्सव स्वराज्यरथ मिरवणूक काढण्यात येणार आहे. ढोलताशा पथकं तसंच शिवकालीन युद्धकला सादर करणाऱ्या रणरागिणी या मिरवणुकीत सहभागी होणार आहेत.***

***छत्रपती संभाजीनगर इथं क्रांती चौकातून सकाळी साडे सात वाजता 'जय शिवाजी–जय भारत' पदयात्रेला प्रारंभ होईल. विभागात सर्वच ठिकाणी निघणाऱ्या या पदयात्रेत नागरिकांनी सहभागी होण्याचं आवाहन प्रशासनानं केलं आहे. विभागात कालपासूनच अनेक ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादनपर नानाविध कार्यक्रम होत असून, पोवाडे आणि शिवगीतांनी परिसर दणाणून गेला आहे.***

दरम्यान, छत्रपती संभाजीनगर इथं क्रांती चौक परिसरात सुरू असलेल्या शिवोत्सवात काल ज्येष्ठ इतिहास संशोधक आणि राज्य शासनाच्या दुर्ग संवर्धन समितीचे मुख्य मार्गदर्शक पांडुरंग बलकवडे यांचं 'शिवरायांची अष्टक्रांती' या विषयावर व्याख्यान झालं, छत्रपती संभाजीनगर महापालिकेच्या वतीनं घेण्यात आलेल्या चित्रकला स्पर्धेलाही शालेय विद्यार्थ्यांचा उत्स्फुर्त सहभाग लाभला.

शिवजयंती निमित्त छत्रपती संभाजीनगर शहरातले प्रमुख पाच मार्ग आज बंद राहणार आहेत. नागरिकांनी याची नोंद घेण्याचं आवाहन पोलिस प्रशासनानं केलं आहे.

परभणी जिल्ह्याच्या जिंतूर तालुक्यात कौसडी इथल्या जिल्हा परिषद शाळेच्या मैदानावर विद्यार्थ्यांनी मानवी साखळीद्वारे शिवरायांची भव्यदिव्य अशी प्रतिकृती साकारली. ९९५ विद्यार्थी यात सहभागी झाले होते.

****

सहाव्या राज्य वित्त आयोगाची स्थापना करायला राज्य मंत्रिमंडळाने काल मान्यता दिली. मंत्रालयात झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. म्हैसाळ उपसा सिंचन योजनेची ऊर्जा कार्यक्षमता वाढवणाऱ्या सौर ऊर्जा प्रकल्पासाठी, एक हजार ५९४ कोटींच्या खर्चाला मान्यता, राज्यातल्या रोपवेच्या कामांसाठी राष्ट्रीय राजमार्ग लॉजिस्टिक व्यवस्थापन लिमिटेडला आवश्यक जागा उपलब्ध करून देण्यास मान्यता, जळगांव जिल्ह्यात चाळीसगांव तालुक्यातल्या वरखेडे लोंढे मध्यम प्रकल्पाच्या एक हजार २७५ कोटी ७८ लाख रुपयांच्या तरतूदीस मान्यता, आदी निर्णयही या बैठकीत घेण्यात आले.

****

यंदाचा केंद्रीय अर्थसंकल्प सर्वसमावेशी असून, महाराष्ट्रासह देशाच्या प्रगतीची आणि विकासाची नवी दालनं खुली करून देणारा असल्याचं प्रतिपादन, केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी केलं आहे. ते काल छत्रपती संभाजीनगर इथं पत्रकार परिषदेत बोलत होते. या अर्थसंकल्पात आरोग्य विभागासाठी जवळपास एक लाख कोटींची भरीव तरतूद करण्यात आली आहे. यामध्ये कर्करोगाचं तत्काळ निदान करण्यासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयांमध्ये डे केअर सेंटर सुरु करणं, ३६ जीवनरक्षक औषधींचे सीमा शुल्क माफ करणं, सहा जीवनरक्षक महागड्या औषधींवरील सीमाशुल्कात कपात, तसंच रुग्णसहाय्यासाठी १३ नवीन उपक्रम आदी विविध उपक्रमांचा यात समावेश असल्याचं जाधव यांनी सांगितलं. देशात लवकरच स्तनांच्या कर्करोगावर लस उपलब्ध होणार असून, यासंदर्भातली चाचणी प्रक्रिया सुरू असल्याची माहिती जाधव यांनी दिली. ते म्हणाले...

***महिलांचे ब्रेस्ट कॅन्सर आणि सर्व्हाइकल कॅन्सर याच्यासाठी एक व्हॅक्सीनचं संशोधन चालु होतं त्याचं संशोधन जवळपास पूर्ण झालेल आहे. त्याच्या ट्रायल सुरु आहेत. आणि लवकरच हे व्हॅक्सीन उपलब्ध होणार आहे. आणि हे व्हॅक्सीन जे अंतीम टप्प्यात आहे. त्या अंतिम टप्प्यातील काम लवकरच पूर्ण होईल. बऱ्याच चाचण्या त्याच्या यशस्वी झाल्या आहेत. हे व्हॅक्सीन नऊ वर्षापासून ते सोळा***

***वर्षापर्यंतच्या आमच्या ज्या मुली आहेत त्यांना दिलं जाणार आहे. भविष्यामध्ये त्यांना ब्रेस्ट कॅन्सर आणि सर्व्हाइकल कॅन्सर होणार नाही.***

****

वारकरी संप्रदाय आणि संत सेवेत अतुलनीय योगदान दिल्याबद्दल जळगाव जिल्ह्यातल्या चाळीसगाव इथले ज्येष्ठ कीर्तनकार हरी भक्त परायण ज्ञानेश्वर माऊली परदेशी यांना यावर्षीचा, राज्यस्तरीय पद्मभूषण डॉ.बाळासाहेब विखे पाटील स्मृती संत सेवा पुरस्कार जाहीर झाला आहे. येत्या १७ मार्चला लोणी बुद्रूक इथं या पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात येणार आहे. मानपत्र, स्मृती चिन्ह आणि २५ हजार रुपये असं या पुरस्काराचं स्वरूप आहे.

****

केंद्र सरकारने मुख्य निवडणूक आयुक्तांच्या केलेल्या नियुक्तीवर लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी टीका केली आहे. आयुक्तांच्या निवड प्रक्रियेला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिलेलं असताना, अशी नियुक्ती जाहीर करणं, ही बाब अशोभनीय असल्याचं त्यांनी म्हटलं आहे. या नेमणुकीविषयी दाखल याचिकेवर सर्वोच्च न्यायालय आज तातडीनं सुनावणी घेणार आहे.

****

नवव्या आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी क्रिकेट स्पर्धेला आजपासून सुरुवात होत आहे. पाकिस्तान आणि दुबईत या स्पर्धेतले सामने होणार असून, आज पहिला सामना कराची इथं पाकिस्तान आणि न्यूझीलंड संघादरम्यान होणार आहे. दुपारी दीड वाजता सामन्याला सुरुवात होईल. रोहीत शर्माच्या नेतृत्वातल्या भारतीय संघाचा पहिला सामना उद्या दुबईत बांग्लादेशविरुद्ध होणार आहे.

****

९८ वं अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन येत्या २१, २२ आणि २३ फेब्रुवारी रोजी दिल्लीत होणार आहे. या साहित्य संमेलनाच्या आम्ही असू अभिजात या गीताला नांदेडच्या संगीतकार आनंदी विकास यांनी संगीतबद्ध केलं आहे. आपल्या भावना त्यांनी या शब्दांत व्यक्त केल्या..

***नुकताच मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला.आणि त्यानंतर हे अभिजात मराठी भाषेचं गीत मी आपल्यासमोर आणलं आहे. हे गाणं म्हणजे खंडकाव्य आहे. दहा अंतऱ्याचं गाणं आहे.पाच हजार वर्षांपासूनचा इतिहास आपल्याला या गाण्यातून ऐकायला मिळणार आहे. मलाही संगीतबद्ध करताना मजा आली. ते एक चॅलेंज होतं माझ्यासाठी आणि ते मी स्विकारलं. आणि जेव्हा राजभवनात त्याची एक राजेशाही थाटात तो जो सोहळा संपन्न झाला आणि मला असं गाणं केल्याच्या दृष्टीने कृतार्थपणाचा क्षण तो मला वाटतो आहे.***

छत्रपती संभाजीनगर इथले साहित्यिक विष्णू सुरासे या साहित्य संमेलनात सहभागी होण्यासाठी दिल्लीला जात आहेत, संमेलनाबाबत आपली भावना त्यांनी या शब्दांत व्यक्त केली...

***मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यामुळे एक मोठं चैतन्य साहित्यिकांमध्ये, लेखकांमध्ये निर्माण झालेलं आहे. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनामध्ये मला कवी म्हणून निमंत्रित करण्यात आले आहे. मी माझ्या काही अत्यंत कसदार अशा रचना या कवी संमेलनामध्ये सादर करण्याचा मी प्रयत्न करणार आहे. यानिमित्ताने पुन्हा एकदा आपली मराठी भाषा, आपलं मराठी साहित्य हे अधिकाधिक लोकांपर्यंत जावं हा एक या साहित्य संमेलनाच्या दृष्टीने प्रयत्न आहे.***

****

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे माजी सरचिटणीस मधुकर अण्णा मुळे यांचं काल छत्रपती संभाजीनगर इथं निधन झालं, ते ८८ वर्षांचे होते. त्यांच्या पार्थिव देहावर काल सायंकाळी छत्रपती संभाजीनगर इथल्या अयोध्यानगरी स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. शैक्षणिक तसंच सामाजिक क्षेत्रातल्या अनेक मान्यवरांनी यावेळी हजर राहून मुळे यांना श्रद्धांजली अर्पण केली. पदवीधर

मतदारसंघाचे आमदार सतीश चव्हाण यांनी मुळे यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त केलं आहे. मराठवाडा शिक्षण संस्थेच्या माध्यमातून मुळे यांनी बहुजन समाजासाठी शिक्षणाची गंगोत्री आणल्याचं, डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे माजी कुलगुरु डॉ विजय पांढरीपांडे यांनी म्हटलं आहे.

****

बीडचे पोलिस अधिक्षक नवनीत काँवत यांनी काल रेकॉर्डवरील गुन्हेगारांशी संवाद साधला. स्वतःमध्ये बदल करून स्वतःचं आणि कुटुंबियांचं जीवन व्यवस्थित करण्याचा सल्ला देतानाच, यापुढे गुन्हे केल्यास कडक कारवाईचा इशाराही त्यांनी दिला आहे.

****

नांदेड जिल्ह्यात दोन मार्चच्या मध्यरात्री पर्यंत शस्त्रबंदी आणि जमावबंदी आदेश लागू करण्यात आला आहे.

परभणी इथं कायदा आणि सुव्यवस्था टिकून राहण्यासाठी जिल्हा पोलिस अधीक्षक रवींद्र सिंह परदेशी यांच्या मार्गदर्शनाखाली शहरातून रूट मार्च काढण्यात आला.

****